महाराष्ट्र लोकसेवा आयोग
MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION
बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ २२६७ ०२१० /१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५
Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mahaonline.gov.in

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग** **धारिका क्रमांक : १५(२)(१८३)/७१०/सात** **जाहिरात क्रमांक : १३३/२०१४**

आयोगामार्फत, सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (तांत्रिक) या पदावरील सरळसेवा भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली अर्हता, अटी व शर्तींची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- चालू रिक्त पदे व अनुशेष भरती :**

| एकूण पदे | अराखीव | अ.जा | अ.ज. | वि.जा .(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११+१२■ | ७+३*+१☑ | ३■ | २■ | १■ | १■ | १■ | ४■ |
| वरील ११चालू रिक्त पदांपैकी १ पद **चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू** प्रवर्गासाठी राखीव. | | | | | | | |
| ■ अनुशेषाची पदे, * उपलब्ध असल्यास महिलासाठी आरक्षित, ☑ खेळाडूसाठी आरक्षित | | | | | | | |

**(१)** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**(२)** वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड) या वर्गवारीसाठी आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, 'महाराष्ट्र लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१', मधील अंतर्गत परिवर्तनीयतेच्या तरतुदीनुसार भरण्यात येईल.

**(३)** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शुद्धिपत्रक क्रमांक अपंग-२०१३/प्र.क्र.३५/अ.क.२, दिनांक १५ जुलै, २०१३ नुसार सदर पदांकरीता दर्शविण्यात आलेले अपंगत्व असलेले उमेदवार संबंधीत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत:-

**(अ) चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू** (Locomotor Disability or Cerebral Palsy), **(ब) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी** (Blindness/Low Vision)

(४) मुलाखतीसाठी पाचारण केल्या गेलेल्या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडू असल्याची प्रमाणपत्रे संचालक, क्रीडा संचालनालयाकडून प्रमाणित करून घ्यावीत.

**३. वेतनश्रेणी**- रु. ९,३००-३४,८०० + ग्रेड पे रु. ४,८००/-, **एकूण वित्तलब्धी अंदाजित रु. ३५,०००/-.**

**४. पात्रता:-**

**४.१** भारतीय नागरिक.

**४.२ वय:-(१) दिनांक १ ऑगस्ट, २०१४** रोजी ३३ वर्षे, मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम.

**(२)** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा अट लागू नाही. तथापि, मागासवर्गीय उमेदवार , शासकीय कर्मचारी आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

**(३)** शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**४.३ शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

(i) Possess a Bachelor's degree in Mechanical Engineering or Electrical Engineering at least in the **Second Class** or

(ii) Possess a Diploma in Mechanical Engineering or Electrical Engineering at least in **Second Class** awarded by the Board or it's equivalent and have passed **sections A and B** of AMIE (India), **and**

**(iii)** Possess, after acquiring the basic academic qualification mentioned above practical experience in a position of responsibility in a workshop or experience in the field of training or teaching experience in Training Institute center or in Industry, preferably connected with Craftsman Training Scheme or Apprenticeship Training Scheme for not less than three years;

**or**

(iv) Possess a Diploma in Mechanical Engineering or Electrical Engineering at least in **Second Class** of a recognised Institute **or** Board and thereafter, possess six years experience in the fields mentioned in sub-clause (iii) above

**Provided that :-**

a)In the case of Master's degree holder, the period spent in acquiring the degree but not exceeding two years may be counted towards the prescribed period of experience.

b)If the candidates with the prescribed period of experience are not available in sufficient number, then those having experience of a shorter period (to the extent ४०%) may also be considered.

c)The age limit may be relaxed by Government on the recommendation of the Commission in favour of candidates possessing exceptional qualifications or experience or both.

**परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.**

Provided further that, preference may be given to candidates who have sufficient experience in administration in Apprenticeship Training Scheme or Craftsman Training Scheme or who have exceptional qualifications or experience or both.

Notwithstanding anything contained in para 4.3 above if at any stage of selection, the Commission is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite higher basic academic qualifications or experience or both are not available to fill up the vacancies reserved for candidates belonging to the Scheduled Castes, Scheduled Castes converts to Buddhism, Scheduled Tribes, Denotified Tribes or Nomadic tribes, then the Commission may, in the case of such selection, relax the requirement in respect of the class in the degree or diploma or the period of experience (to the extent ४०%) or both setout therein and select suitable candidates belonging to such Castes or Tribes.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७.कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. **शुल्क : १) अमागास - रु. ५१५/- २) मागासवर्गीय - रु. ३१५/-**

९. **अर्ज करण्याची पद्धत :-**

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ **पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे दिनांक २८ एप्रिल, २०१४ ते दिनांक १८ मे, २०१४ या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.**

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड. (४) क्रेडिट कार्ड. (५) संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

९.६ **www.mahaonline.gov.in** येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-.

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील “ माझे खाते ” या लिंक वर क्लिक करावे.

(२) “ माझे खाते ” या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ‘Unpaid’ असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ‘Pay Now’ अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) “ Pay Now ” या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०. चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

११. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२. **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची तसेच चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १८ मे, २०१४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१३. **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक दिनांक १९ मे, २०१४ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण : मुंबई** **प्र. दा. अडसूळे**

**दिनांकः २८ एप्रिल, २०१४** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**